सन २०१८, खरीप हंगामात शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या भागात जनावरांच्या चारा छावण्यांची माहे मे,२०१९ ची देयके अदा करण्याकरीता विभागीय आयुक्त यांना लेखाशीर्ष (२२४५२१४९) अंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.
(औरंगाबाद / नाशिक विभाग)

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक-एससीवाय-०४/२०१९/प्र.क.२६/म-११,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक:- २४ जून , २०१९.

<u>वाचा</u>:-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.२५/०१/२०१९.

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.१३/०२/२०१९.

३) महसूल व वन विभाग, शासन पत्र, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.०८/०३/२०१९.

४) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.१२६/म-७, दि.२२/०३/२०१९.

५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.०४/०५/२०१९.

६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-एससीवाय-०४/२०१९/प्र.क.२६/म-११, दि. ०३/०५/२०१९, दि. ०४/०५/२०१९, दि. १०/०५/२०१९, दि.०१/०६/२०१९ व दि.०६/०६/२०१९,दि.११/०६/२०१९.

७) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.१६/०५/२०१९.

८) विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०१९/महसूल/नैआ/पाटं/सीआर-१३, दि. ३१/०५/२०१९.

९) विभागीय आयुक्त,नाशिक यांचे पत्र जा.क्र. ७४९८/निधिमा/२०१८/प्र.क्र.४४/तामे-२३/०४/ दि.०६/०६/२०१९.

१०) महसूल व वन विभाग,पुनर्वि-२०१९/२२४५/प्र.क्र.८४/ब-१, दिनांक २० जून,२०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

सन २०१८ च्या खरीप हंगामात राज्यातील जिल्हयांमध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्याने, शासनाने राज्यातील २६ जिल्हयांमध्ये १५१ तालुक्यात, या

१५१ तालुक्यांव्यतिरिक्त २६८ महसुली मंडळामध्ये दुष्काळ तसेच, या क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील ९३१ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेली आहे. दुष्काळग्रस्त भागातील जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या प्रश्नावर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसदर्भात दिनांक २४/०१/२०१९ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत, राज्यातील दुष्काळी भागात आवश्यकतेनुसार जनावरांना चारा व पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जनावरांच्या छावण्या उघडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार विभागीय आयुक्त, नाशिक / औरंगाबाद / पुणे यांनी मागणी केल्यानुसार जनावरांच्या चारा छावण्यांसाठी लेखाशीर्ष (२२४५ ००७५) व (२२४५ २१४९) या दोन लेखाशीर्षांत अर्थसंकल्पीय प्रणालीद्वारे खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यात आला आहे.

अ.क्र.	विभाग	लेखाशीर्ष	शासन निर्णय दिनांक	अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत निधी
१	**नाशिक विभाग**	२२४५ ००७५	दिनांक ०३/०५/२०१९	४६,८१,२१,०९९/-
		२२४५००७५	दिनांक ११/०६/२०१९	८६,२८,२०,०००/-
२	**औरंगाबाद विभाग**	२२७५००७५	दिनांक ०४/०५/२०१९	१११,८७,२१,२८४/-
		२२४५००७५	दिनांक ०६/०६/२०१९	१०४,६३,२५,०३९/-
		२२४५२१४९	दिनांक ०१/०६/२०१९	२४,१८,३५,०००/-
३	**पुणे विभाग**	२२४५००७५	दिनांक १०/०५/२०१९	३,७९,०९,४९२/-
		२२४५२१४९	दिनांक ०१/०६/२०१९	१,०७,९६,०००/-
			एकूण	**३७८,६५,२७,९१४/-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक ०३ मधील दिनांक ०८/०३/२०१९ च्या पत्रान्वये दिनांक १ एप्रिल,२०१९ पासून मोठे जनावरांसाठी रुपये ९०/- प्रतिदिन व लहान जनावरांसाठी रुपये ४५/- प्रतिदिन असा दर लागू केल्यामुळे मोठया जनावरांसाठी रुपये २० व लहान जनावरांसाठी रुपये १० प्रतिदिन असा वाढीव खर्च तसेच दिनांक १६/०५/२०१९ च्या शासननिर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मोठे जनावरांसाठी रुपये १००/- प्रतिदिन व छोटे

जनावरांसाठी रुपये ५०/- प्रतिदिन असा दर दिनांक १६/०५/२०१९ पासून अनुज्ञेय असल्यामुळे या दरवाढीमूळे मोठया जनावरांसाठी होणारा वाढीव खर्च रुपये ३० प्रतिदिन व लहान जनावरांसाठी रुपये १५/- प्रतिदिन हा खर्च लेखाशीर्ष (२२४५ २१४९) या लेखाशीर्षातून खर्च करण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद व नाशिक यांनी उपरोक्त संदर्भ क्र. ०७ व ०८ अन्वये वाढीव खर्चासाठी निधीची मागणी केली आहे. लेखाशीर्ष क्र.(२२४५ २१४९) अंतर्गत एकुण रुपये ७०,६५,५८,०००/- इतका पुनर्विनियोजनाने प्राप्त निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

औरंगाबाद व नाशिक विभागात टंचाईग्रस्त भागात आवश्यकतेनुसार उघडण्यात आलेल्या जनावरांच्या छावण्यांची माहे मे महिन्यातील देयके अदा करण्यांसाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद / नाशिक यांनी दिनांक १ मे, २०१९ ते ३१ मे,२०१९ पर्यंतचा वाढीव खर्च (२२४५ २१४९) या लेखाशीर्षातून खर्च करण्याकरीता निधीची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त,औरंगाबाद/नाशिक यांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे वितरीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	विभाग	लेखाशीर्ष (२२४५ २१४९) अंतर्गत बीम्स प्रणालीद्वारे वितरीत करावयाचा निधी
१	औरंगाबाद	३८,२४,४१,०००/-
२	नाशिक	३२,४१,१७,०००/-
	एकुण रुपये	**७०,६५,५८,०००/-**

२. सन २०१९-२० या चालू वित्तीय वर्षामध्ये मागणी क्र.सी-६,२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, (९२) (०७) वैरण पुरवठा (अनिवार्य) ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ २१४९) या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून एकुण **रुपये ७०,६५,५८,०००/- (अक्षरी रुपये सत्तर कोटी, पासष्ट लक्ष, अठ्ठावन्न हजार फक्त)** इतका पुनर्विनियोजनाद्वारे प्राप्त निधी अर्थसंकल्पीय प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तो त्यांनी तात्काळ संबंधित जिल्हाधिकारी यांना वितरीत करावा.

३. सदर निधी मिळाल्यापासून चारा छावणी देयकांच्या अदायगीचे काम त्वरीत पूर्ण करावे, चारा छावणीबाबत उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१९, दिनांक १३/०२/२०१९ , दिनांक शासन परिपत्रक दिनांक २२/०३/२०१९, शासन पत्र क्रमांक दिनांक ०८/०३/२०१९, शा.नि. दिनांक ०४/०५/२०१९ व शा.नि. दिनांक १६/०५/२०१९

मध्ये नमूद निकष, विहित अटी व शर्ती व त्यामधील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

४. वितरीत निधी स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) अथवा बँक खात्यात न ठेवता तो छावणी प्रायोजक संस्था यांना थेट Electronic Clearing Services द्वारे वितरीत केला जाईल, या अटींच्या अधिन निधी वितरीत करण्यात येत आहे. तरी त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी.

५. विभागीय आयुक्त, औरंगाबाद व नाशिक यांनी संबंधितांना निधी वितरीत केल्यानंतरच एकुण वितरीत निधीच्या ७५% रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतरच यापुढील निधी मागणीबाबत कार्यवाही करावी.

६. सदर निधीचे वाटप अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर विभागीय आयुक्त, औरंगाबाद/नाशिक यांना करण्यात येत आहे. निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची विभागीय आयुक्त यांनी खातरजमा करावी. याबाबतची माहिती संबंधित विभागीय आयुक्त यांनी या विभागाकडे मासिक खर्चाचा अहवालासोबत सादर करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेखे/नोंदवह्या विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरित व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाच्या हिशोब पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित विभागीय आयुक्त यांनी एकत्रित महसूल व वन विभागास (कार्यासन म-११) न चुकता सादर करावा. झालेल्या खर्चाची महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी ताळमेळ घेऊन त्याबाबतचे **उपयोगिता प्रमाणपत्र** या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहित वेळेत शासनास प्रत्यार्पित करावी.

७. नियंत्रक अधिकाऱ्यांनी अनुदान वाटपाची एक प्रत सचिव (मदत व पुनर्वसन) यांना न चुकता सादर करावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार/उपकोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणाऱ्या बिलासोबत जोडल्या जाणाऱ्या संगणक चिठ्ठीमध्ये गौण/उपशिर्षाच्या संगणक संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा, असे आदेश कृपया संबंधित अधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकाऱ्यांनी दयावेत. तसेच कोषागारातून/ उपकोषागारातून आहरित केलेल्या रकमेचा अहवाल शासनास सादर करावा.

८.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२५१५०१४४४११९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJASHREE
MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723db4deb16f5f2,
postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d04e043dc0b8ef0fd64,
ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.06.25 15:06:43 +05'30'

(राजश्री राऊत)

वित्तीय सल्लागार व सह सचिव

प्रति,

१. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद / नाशिक.
५. जिल्हाधिकारी, औरंगाबाद/नाशिक
६. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
७. महालेखापाल १/२(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर (३ प्रती).
८. वित्त विभाग (अर्थसंकल्प-६/व्यय-९/अर्थोपाय कक्ष / वित्त आयोग कक्ष), मंत्रालय, मुंबई,
९. कार्यासन अधिकारी (म-७), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई,
१०.निवडनस्ती, (कार्यासन म-११)